# यवतमाळ जिल्हा पोलीस राजपत्र

# दिनांक - 14/06/2020

राजपत्रातील ०६ भाग –

| | |
|---|---|
| भाग – ०१ | **बदली /नेमणुक /पदोन्नती** |
| भाग – ०२ | **रजा** |
| भाग – ०३ | **वेतन/भत्ते / रोखिकरण** |
| भाग – ०४ | **बक्षिस / मानधन** |
| भाग – ०५ | **शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती** |
| भाग – ०६ | **प्रशिक्षण व इतर** |

---

मा. पोलीस अधीक्षक,
यांचे मान्यतेनुसार

( एम. एम. बागवान )
पोलीस उप अधी.(मुख्या)
पोलीस अधीक्षक यवतमाळ करीता

प्रति,

<u>प्रभारी अधिकारी, सायबर सेल यवतमाळ</u> :– सदरचे गॅझेट हे जिल्हा पोलीस दल यवतमाळ चे www.yavatmalpolice.gov.in या अधिकृत संकेत स्थळावर GAZETTE या मथळयाखाली प्रसिद्ध करावे. तसेच जिल्हयातील प्रत्येक पोस्टे./उपविपोअ./अधिकारी यांचे E - Mail वरती पाठवावे.

क्र :पोअय/डिपी/३१-बी/वि.चौ/अं.आ/नापोशि-१८३४ आशिष गुल्हाणे/ 4644 /२०२० यवतमाळ दि. 14 JUN 2020 12 JUN 2020

## अंतिम आदेश

**अपचा-यांचे नांव :-** नापोशि/१८३४ आशिष गुल्हाणे, नेमणुक स्था.गु.शा. यवतमाळ, सध्या पो.मुख्या. यवतमाळ.

**दोषारोप :-**

**१)** आपण नापोशि/१८३४ आशिष गुल्हाने, स्था.गु.शा, येथे नेमणुकीस असतांना आपले पत्नीचे रिपोर्ट वरुन पो.स्टे.वडगांव रोड येथे अप.क्र.८०/२०१५ कलम ४९८,२९४,३४ भादवि व पो.स्टे.खोलापुरी गेट अमरावती शहर येथे अप क्र.०३/२०१६ क्र.३५४ अ,५०४,५०६, भादवि सह क.६७(ब) माहीती तंत्रज्ञान अधिनियम असे कौटुंबिक हिंसाचाराचे ०२ गुन्हे नोंद असुन न्यायप्रविष्ठ आहेत. आपण पोलीस विभागात कार्यरत असल्याने आपणास परीपुर्ण कायद्याचे ज्ञान असतांना सुध्दा पत्नीशी जवळीक साधुन तिचे मोबाईल वर नग्न फोटो व अश्लिल फोटो, मेसेजेस पाठवुन पोलीस विभागास अशोभनीय बाब केलेली आहे. आपण आजारी असल्याने दि.०३/०१/२०१६ पासुन सीक पास घेवुन गेले तसेच इलाजाबाबत कोणतेही कागदपत्रे दिलेली नाही. आपली पोलीस दलात दिर्घकाळ सेवा झाली असुन आपणास पोलीस दलातील शिस्तीचे व कायद्याचे परीपुर्ण ज्ञान असतांना सुध्दा आपणाविरुध्द नमुद ०२ गुन्हे दाखल झाले आहे. आपले हया कत्यामुळे पोलीस दलाची प्रतिमा जनमानसात मलीन झाली आहे.

उपरोक्त प्रकरणी या कार्यालयाचे आदेश क्र. डिपी/३१-बी/प्राचौ/नापोशि-१८३४-गुल्हाणे/४५७४/२०१९, दिनांक २८/०४/२०१६ अन्वये प्राथमीक चौकशी आदेशीत करण्यात येवुन सदर प्राथमीक चौकशीत साक्षदार व दस्ताऐवजी पुराव्यावरुन वर नमुद कसुरी केल्याचे निष्पन्न झाले आहे. पोलीस खात्यात असता अशोभनीय व गैरशिस्तीच्या वर्तना बाबत **आपणास मुंबई पोलीस (शिक्षा आणी अपीले ) नियम १९५६ मधिल तरतुदीनुसार पुडील देय वार्षीक वेतनवाढ दोन (०२) वर्षाकरीता (अपरिणामकारक) स्थगीतीची शिक्षा का देण्यात येवू नये ?** म्हणुन दिनांक २३/०३/२०२० अन्वये कादानो देण्यात आली. सदरची कादानो दि.२/०३/२०२० रोजी स्विकारुन त्यावर दि. ०४/०५/२०२० रोजी स्पष्टिकरण सादर केले आहे. अंतिम आदेश निर्गमित करण्या पुर्वी अपचारी यांना त्यांचे मौखिक म्हणने मांडण्याकरीता दि. ०९/०/२०२० रोजी आज्ञांकित कक्षात बोलविण्यात आले असता मौखिक म्हणने ऐकुण घेण्यात आले. स्पष्टिकरण व मौखिक म्हणने समाधानकारक असल्याने प्रस्तावित शिक्षेत बदल करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

**मी पोलीस अधिक्षक, यवतमाळ याद्वारे, अपचारी नापोशि/१८३४ आशिष गुल्हाणे यांनी दिलेले लेखी व मौखिक स्पष्टीकरण समाधानकारक असल्याने सदरचे प्रकरण नस्तिबंध करण्यात येत आहे.**

**( एम.राज कुमार)**
**पोलीस अधिक्षक, यवतमाळ**

| | |
|---|---|
| प्रतीः- | **नापोशि/१८३४ आशिष गुल्हाणे**, नेमणुक पोलीस मुख्यालय यवतमाळ. |
| मार्फत :- | राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय यवतमाळ. |
| २/- | सोबत अंतिम आदेशाच्या २ प्रती पाठविण्यात येत असुन त्यातील एक एक प्रत कसुरदारास अदा करुन दुय्यम प्रतीवर दिनांकित स्वाक्षरी घेवून ती प्रत इकडील कार्यालयास विनाविलंब परत करावी |
| प्रत :- | पोउपअधि(मुख्या)/आस्थापना लिपीक (कर्मचारी ) /सआली-०४/डिपीजी लिपीक यांना उचित कार्यवाहीस्तव. |